

संस्कृत साहित्य सरिता

कर्णभार

संस्कृत
साहित्य
सरिता
:२९

भास-कृत

कर्णभार

कथासार
अमरेन्द्र



वोरा ॲन्ड कंपनी, पब्लिशर्स (प्रायव्हेट) लि०

प्रकाशक :
एम्. के. वोरा
वोरा अँन्ड कंपनी,
पब्लिशर्स (प्रायव्हेट) लि०
३ राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रस्ता, मुंबई २

किमत सहा आणे
पहिली आवृत्ति : १९५६

मुद्रक :
अनंत चिंतामण रायरीकर
'स्वस्तिक मुद्रणालय'
४३९ शनवार पेठ, पुणें २.

संस्कृत-साहित्य-सरिता

विशाल महासागराला असंख्य नद्या येऊन मिळत असतात.अशा अगणित नद्यांनींच अमर्याद सागर बनलेला असतो. संस्कृत साहित्याचा महासागरहि असाच अनेक सरितांनीं समृद्ध झालेला आहे. 'संस्कृत-साहित्य-सरिता' असें नांव दिलेल्या या वाङ्मयमालेंतून आपली आदिभाषा जी संस्कृत तिच्यांतील उत्तम उत्तम वाङ्मयाचा कथारूपानें थोडक्यांत परिचय करून देण्याचें आम्हीं योजिलें आहे. संस्कृत वाचणारे थोडे आणि समजणारे तर त्याहून कमी. तेव्हां आजच्या सर्वसामान्य माणसाला, लिहितां-वाचतां येऊं लागलेल्या नवशिक्षितालाहि या संस्कृत-वाणीचा आस्वाद कसा घेतां येणार? परंतु त्यांना तो मिळणें तर आवश्यक आहे; कारण संस्कृत भाषेंतील वाङ्मय हा आपला फार थोर वारसा आहे. तो गमावणें म्हणजे सर्वस्वच गमावून बसणें. यासाठींच संस्कृत भाषेंतील थोर, प्रसिद्ध अशा वाङ्मयकृतींचें, नाटकांचें आणि काव्यांचें, कथासार आम्ही वाचकांपुढें सादर करीत आहोंत.

आम्ही असें समजतों कीं, देवभाषेंतील या वाङ्मयीन कलाकृतींचा परिचय करून देण्याची आमची ही योजना एक चांगली योजना आहे—एक सत्संकल्प आहे. आणि असे सत्संकल्प उत्तम रीतीनें तडीला नेण्याचें काम जनताजनार्दनाचेंच आहे. तें तसें घडो, हीच इच्छा.

—प्रकाशक

प रि च य

भासाच्या एकूण तेरा नाटकांपैकीं सहा महाभारतीय कथानकावर आधारलेलीं आहेत. त्यांतील सर्वांत लहान नाटक 'कर्णभार'. खरें म्हणजे ही आधुनिक भाषेंत सांगावयाचें झालें तर एकांकिकाच म्हटली पाहिजे. यांत कथावस्तु अशी फारच थोडी. जें आहे तें कर्णाचें मुख्यतः आत्मचरित्र; आणि तात्कालिक प्रसंग म्हणजे त्याच्या कवच-कुण्डलांचें इन्द्राकडून झालेलें हरण. तथापि हा प्रसंगहि त्याच्या करुण गंभीर जीवन-चरित्राला अगदीं शोभून दिसण्यासारखाच आहे. कर्णाचें उदात्त चित्र भासानें या नाटकांत रेखाटलें आहे.

भासानें आपल्या इतर नाटकांप्रमाणें 'कर्णभार' नाटकासाठीं महाभारतांतील कथेपेक्षां वेगळें असें कथानक उभारलेलें नाहीं. घटना जवळ जवळ सर्व महाभारतांतीलच आहेत. त्या मुळांत वेगवेगळ्या ठिकाणीं वेगवेगळ्या संदर्भांत आलेल्या होत्या, त्या एकत्र गुंफून त्यांतून भासानें कर्णाचें चरित्रचित्र पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे, इतकेंच.

महाभारतीय युद्धांत कौरवांचे सेनापति द्रोण यांचा वध झाल्यानंतर दुर्योधनानें कर्णाला सेनापतिपदाचा अभिषेक केला. युद्धसंचालनाचा भार आतां कर्णावर पडला. त्याला उद्देशूनच 'कर्णभार' हें नांव भासानें या नाटकाला दिलें आहे. भासाचे बहुतेक सर्व नाट्यगुण या छोटयाशा नाटिकेंतहि पाहावयाला मिळतात.

—लेखक

कर्णभार

कौरव-पांडवांमध्यें सुरू झालेलें भारतीय युद्ध निकरावर आलें होतें. कौरवपक्षाचे भीष्म व द्रोण हे धुरंधर सेनापति रणांत पडले. तेव्हां राजा दुर्योधनानें आपला आवडता मित्र व साहाय्यक अंगराज कर्ण याला सेनापतिपद दिलें.

कर्णाला परिस्थितीची कल्पना होती. आपल्या शिरावर केवढी मोठी जबाबदारी येऊन पडलेली आहे हें तो जाणत होता. पांडवांचें सामर्थ्य त्याला माहीत होतें, तसाच स्वतःच्या पराक्रमाबद्दलहि त्याला आत्मविश्वास होता. कौरवपक्षाच्या सेनापतिपदाचा भार आपल्यावर सोंपवून दुर्योधनानें आपल्यावर फार मोठी जोखीम टाकलेली आहे, आपल्या आयुष्यांतला हा अति महत्त्वाचा प्रसंग आहे हें तो समजून चुकला होता. परंतु या सर्व परिस्थितीवर एका दुर्दैवी प्रकाराची दाट छाया पडलेली होती. तो प्रकार दुर्दैवी तसाच अत्यंत विचित्र होता. कर्ण त्याबाबतींत स्वतः कांहींहि करूं शकत नव्हता. कांहीं करतां येण्यासारखें

आपल्या हातीं नाहीं हें पाहून तो शूर व दिलदार पुरुष हतबुद्ध होऊन गेलेला होता.

धर्मयुद्धाच्या नियमाप्रमाणें, दुसरा दिवस उजाडला आणि युद्धाची वेळ झाली. कर्ण युद्धभूमीवर जावयाला निघाला. कोणी हत्तीवर, कोणी घोड्यावर तर कोणी रथावर बसलेलें एक एक पराक्रमी राजे हळुहळु रणांगणांत उतरूं लागले. त्यांच्या अग्रभागीं अर्जुनाच्या रथावरील ध्वज फडकतांना दिसत होता.

तें पाहून दुयोधनानेंहि आपली सेना रणांत लोटण्याची व्यवस्था केली. कर्ण आपल्या तंबूतून बाहेर पडला. त्याच्याबरोबर शल्य आणि इतर लढाऊ परिवारहि होता. कौरवसैन्याच्या पुढें त्याचा रथ चालूं लागला. सर्वत्र युद्धोत्साह संचरूं लागला. परंतु कर्णाच्या चेहेऱ्यावर मात्र खिन्नता पसरली होती. उन्हाळ्यांतील ढगांनीं सूर्य जसा झांकला जावा तसा तो दिसत होता. त्याची कांति अति तेजस्वी होती; बुद्धि व शौर्य यांची त्याच्यापाशीं समृद्धि होती. तरी त्याच्या चेहऱ्यावरील

विषण्णता झांकली जात नव्हती. 'असें कां असावें ?' त्या वेळीं त्याच्याकडे पाहाणाऱ्या प्रत्येकाला हा प्रश्न पडत होता. किंबहुना स्वत: कर्णाचाहि सुरुवातीला या प्रश्नानें गोंधळ उडविला. परंतु ज्यांना कर्णाचें पूर्वचरित्र माहीत होतें त्यांना त्याचें असें कोडें पडण्याचें कारण नव्हतें.

शल्य कर्णाचा सारथी बनला होता. सारथ्याच्या कामांत तो अतिशय कुशल असल्यानें त्याच्याकडे हें काम आलें होतें. शल्य कर्णाचा पराक्रम जाणत नव्हता असें नव्हे; तरीपण त्याला आज काय होणार याबद्दल शंका वाटत होती. ती त्यानें कर्णापाशीं उघड बोलूनहि दाखविली होती. परंतु तोंपर्यंत कर्णाला स्वत:च्या सामर्थ्याबद्दल आत्मविश्वास होता. समरांगणांत माझ्यासमोर आले आणि आपला जीव वांचवून कोणी परत गेले, असें कधीं घडणारच नाहीं अशी त्याची खात्री होती. कौरवांचें हित हेंच तो रणभूमीवरील आपलें कर्तव्य समजत होता. त्यामुळे त्यानें शल्याला प्रथम मोठ्या उत्साहानें म्हटलें कीं, "शल्यराज, जिकडे अर्जुन असेल तिकडेच माझा रथ घेऊन चला. पाहूं, आज तो अर्जुन माझ्या हातीं लागला तर!"

कर्णाचा रथ वेगानें धाडधाड करीत अर्जुनाकडे जाऊं लागला. कर्ण रथांत बसला होता आणि शल्यराज रथ हांकीत होता. युद्धाला रंग चढत होता. दोन्ही सैन्यें एकमेकांशीं भिडलीं होतीं. एकमेकांच्या शस्त्रांनीं घायाळ होऊन योद्धे खालीं कोसळत होते. तसेच निकामी झालेले हत्ती, घोडे व रथ यांचाहि हळुहळु खच पडूं लागला होता. स्वतः कर्णाचा पराक्रम तर कृतान्त-यमासारखा होता. असें असतांना ऐन युद्धाला निघालों असतांना आपल्या मनावर विषण्णतेची अशी छाया कां पडावी हें त्यालाहि प्रथम उमगेना.

हळुहळु त्याला आठवूं लागलें: ‘ त्या दिवशीं रात्रीं लपत-छपत कुंती त्याच्याकडे आली होती. तिनें हळुच सांगितलें होतें, “ बाळा, तूं माझाच मुलगा. युधिष्ठिरादि पांची पांडव हे तुझे भाऊ. तेव्हां तूं त्यांच्यावर शस्त्र चालवूं नकोस. त्यांच्या प्राणांची भिक्षा मला घाल. ” केवढी महत्त्वाची गोष्ट आपल्याला कळली होती. केवढें विलक्षण रहस्य आपल्याला समजलें होतें. पण, पण त्याचा त्यावेळीं कांहीं उपयोग नव्हता. कौरवराज

दुर्योधनाला पांडवांच्या नाशाचें वचन आपण देऊन चुकलों होतों. त्यामुळें प्रत्यक्ष जन्मदात्या आईनें जें मागितलें तेंहि तिला आपण देऊं शकलों नाहीं. तिच्यासाठीं कबूल केलें तें एवढेंच कीं 'अर्जुनाखेरीज बाकीच्या चार पांडवांचा वध मी करणार नाहीं.' आईला दिलेल्या या वचनानें आपले हात बांधले गेलेले आहेत.' हें लक्षांत येतांच आपल्या खिन्नतेचा त्याला बराच उलगडा झाला.

आज खरोखर आपल्या ठिकाणच्या शौर्य वीर्य-पराक्रम इत्यादि गुणांचा प्रभाव प्रकट करण्याचा मोका आलेला आहे हें कर्णाला दिसत होतें. परंतु या संधीचा लाभ त्याला करून घेतां येण्यासारखा नव्हता हेंहि त्याला समजत होतें. पूर्वीच्या त्या दुर्दैवी प्रसंगाची त्याला आज पुन्हां आठवण झाली. कर्ण परशुरामाच्या शापाचा सारा दुःखद प्रसंग शल्याला सांगूं लागला :

मी त्या दिवशीं पहिल्यानेंच जामदग्न्याकडे गेलों होतों. त्याच्या डोक्यावरचा जटाभार विजेसारखा चमचम करीत होता. त्याच्या हातांत तेजस्वी परशु

तळपत होता. क्षत्रियांचा काळ असलेल्या व भृगुवंशाच्या निशाणाप्रमाणें शोभणाऱ्या त्या मुनिश्रेष्ठाला मीं नमस्कार केला आणि नम्रपणानें बाजूला उभा राहिलों.

तेव्हां जामदग्न्यांनीं मला आशीर्वाद दिला आणि विचारलें, 'कोण तूं ? कशासाठीं आला आहेस इथे?'

'भगवान, आपल्यापाशीं सर्व शस्त्रास्त्रविद्या शिकावी या हेतूनें मी आलों आहें,' मी नम्रपणानें उत्तर दिलें.

त्यावर जामदग्न्य म्हणाले, 'मी फक्त ब्राह्मणांनाच ही विद्या शिकवीत असतों; क्षत्रियांना नाहीं.'

मला तें माहीतच होतें त्यामुळें मी चटकन सांगून टाकलें कीं, 'मी क्षत्रिय नाहीं.' क्षत्रियवंशाशीं परशुरामाचें पूर्वापार वैर आहे हें साऱ्यांनाच माहीत होतें. त्यामुळें एवढेंच सांगून मी वेळ मारून नेली. माझा विद्याभ्यास सुरू झाला. मी गुरूंची सेवा करूं लागलों. नेहमीं त्यांच्याबरोबर राहूं लागलों. असा कांहीं काळ लोटला. पुढें एकदां फळें, कंदमुळें, समिधा,

दर्भ, फुलें इत्यादि आणण्यासाठीं गुरु रानांत गेले होते. मीहि त्यांच्याबरोबर होतोंच. बराच वेळ हिंडावें लागल्यानें गुरु थकले व विश्रांतिसाठीं एके ठिकाणीं थांबले. थोडी झोंप घ्यावी असें मनांत आल्यानें ते माझ्या मांडीवर डोकें ठेवून शांतपणें झोंपीं गेले.

थोडयाच वेळांत माझ्या मांडीला भयंकर वेदना होऊं लागल्या. पाहातों तों वज्रमुख नांवाचा एक किडा माझी मांडी पोखरीत होता. गुरु तर गाढ झोंपले होते. त्यांची झोंपमोड होऊं देणें मला योग्य वाटत नव्हतें. म्हणून मी त्या भयंकर वेदनाहि तशाच धैर्यानें सोशीत स्वस्थ राहिलों. गुरूंची झोंप पुरी झाली. ते जागे होतांच पाहूं लागले तों माझें अंग जखमांनीं झालेल्या रक्तानें माखलेलें. चाणाक्ष गुरूंच्या तत्काळ लक्षांत आलें कीं इतकी विलक्षण सहनशक्ति असणारा हा ब्राह्मण नव्हे, हा क्षत्रियच असला पाहिजे ! मग काय विचारतां ! त्यांचा क्रोधाग्नि भडकला आणि त्यांनीं मला तत्काळ शाप देऊन टाकला,' तुझीं अस्त्रें ऐन वेळीं निरुपयोगी होतील!'

कर्णाच्या मनांत आलें कीं परशुरामानें शाप दिला आहे हें तर खरेंच. परंतु आतां अगदीं ऐन वेळ येऊन ठेपली आहे, तेव्हां खरोखरीच आपलीं अस्त्रें निरुपयोगी झालीं आहेत किंवा काय हें प्रत्यक्ष पाहूनच घ्यावें. त्याप्रमाणें त्यानें अस्त्रें उपयोगांत येण्यासारखीं आहेत काय याची परीक्षा करून पाहिली. परंतु तीं फुकट गेलेलीं आहेत हें त्याच्या लक्षांत आलें. अर्थातच त्याला फार वाईट वाटलें. ज्या अस्त्रविद्येबद्दल सर्वत्र त्याची ख्याति झालेली होती तीं अस्त्रें त्यांचा जेव्हां खरा उपयोग व्हावयाचा अशा आणीबाणीच्या वेळींच त्याच्या दृष्टीनें निरुपयोगी ठरावींत, हा केवढा दैवदुर्विलास होता ! कर्णासारख्या योध्याला तर ही गोष्ट फारच जाणवली.

तथापि, याहि विपरीत स्थितींत रणांतून मागें फिरणारा तो नव्हता. तो जातिवंत लढवय्या होता. परंतु यावेळीं दैवानेंहि त्याची परीक्षाच पाहावयाचें ठरविलें होतें.

रणांगणावरील परिस्थिति कौरवांना प्रतिकूल होत चालली होती. एक तऱ्हेची अशुभ स्थितीची छाया सगळीकडे

पडत होती. घोडे उत्साहानें फुरफुरून धांवण्याऐवजीं दीनवाणे होऊन, डोळे मिटून घेऊन मोठ्या कष्टानें एक एक पाऊल उचलीत होते. हत्तींचीहि तीच स्थिति झाली होती. शंख व दुंदुभी यांचा आवाजहि बंद पडला होता. त्यामुळें साहजिकच कर्णाला वाटलें कीं हीं सर्व लक्षणें आपला येऊं घातलेला पराभवच सुचवीत आहेत. त्यानें तसें बोलून दाखवितांच शल्यालाहि वाईट वाटलें. परंतु कर्ण तसें म्हणाला तरी त्यामुळें कांहीं युद्धांतून थोडाच माघारा जाणार होता !

तो म्हणाला, "लढाईंत मरण आलें तर योध्याला स्वर्ग लाभतो आणि त्याचा जय झाला तर तो कीर्ति मिळवितो. तेव्हां युद्ध हें योध्याला कोणत्याच दृष्टीनें निष्फळ झालें असें म्हणतां येणार नाहीं. आणि जर दैवानेंच माझें रक्षण व्हावयाचें असेल तर कांबोज देशांतील हे रथाचे गरुडवेगी घोडेहि माझें रक्षण करतील."

कर्णानें मनानें तयारी केली. गोब्राह्मण, पतिव्रता, लढाईंतून पळ न काढतां ठाण मांडून उभे राहाणारे वीर हीं सर्व आणि या आणीबाणीच्या प्रसंगीं आपण स्वतःहि

अक्षय सुखरूप असावें अशी त्यानें प्रार्थना केली. त्याच्या मनाचा निर्धार झाल्यामुळें त्याला एक प्रकारचें समाधान लाभलें. काळजीनें भारावलेलें त्याचें मन हलकें झालें.आणि तो युद्धाच्या रणधुमाळींत शिरण्यासाठीं सज्ज झाला. पांडवांनीं चालविलेल्या भयंकर युद्धाला तोंड देणें महा कठीण झालें होतें. तरी तशाहि धुमश्चक्रींत शिरून आपल्या गुणगौरवानें प्रसिद्ध असलेल्या धर्माला आपण पकडून आणूं अशी ईर्षा कर्णानें बांधली. धर्माला बंदिवान करणें म्हणजे प्रथम अर्जुनाला आपल्या बाणांना बळीं देऊन समरंगणांत लोळवणें आवश्यकच होतें. आणि तें काम एकदां झालें म्हणजे वनराज सिंहाला ठार मारून मग निर्भय झालेल्या त्या वनांत डौलानें प्रवेश करण्याइतकेंच पांडवांचें पारिपत्य करणें कर्णाला सोपें होतें. कर्ण हें सर्व जाणून होता. त्यानें तें सर्व लक्षांत घेऊनच शल्याला आपला रथ अर्जुन असेल तिकडे हांकण्यास सांगितलें.

इतक्यांत दुरून कोणीतरी मोठ्यानें म्हणत असल्याचें कर्णानें ऐकिलें कीं, " कर्णा ! मी फार मोठी भिक्षा तुझ्याजवळ मागत आहें ! " त्या आवाजावरूनच कर्णानें ओळखलें कीं हा कांहीं कोणा सामान्य ब्राह्मणाचा शब्द नव्हे. त्याच्या आवाजांतहि मोठा प्रभाव जाणवत होता. तो

धीरगंभीर आवाज ऐकून कर्णाच्या रथाचे जातिवंत घोडेहि चित्रासारखे तटस्थ होऊन जागच्या जागीं उभे राहिले. माना मागें वळवून, कान टवकारून आणि डोळे विस्फारून ते पाहूं लागले; इतका त्या आवाजांत गोडवा होता आणि गांभीर्यहि पण होतें.

कर्णानें थबकून स्वतःच त्या ब्राह्मणाला हांक मारून पुढें येण्यास विनंती केली. आणि एक तेजस्वी, प्रभावी ब्राह्मण त्याच्यासमोर येऊन उभा राहिला. तो दिसत होता ब्राह्मण खरा, पण तो होता इन्द्र. ब्राह्मणवेषानें आलेल्या त्या इन्द्राला कर्णापाशीं खरोखरीच फार मोठी भिक्षा मागावयाची होती. त्यामुळें कर्णासमोर येतांच तो पुन्हां म्हणाला, “ कर्णा ! मी फार मोठी भिक्षा तुझ्यापाशीं मागावयास आलों आहें. ”

बिचाऱ्या कर्णाला काय माहीत कीं हा याचक ब्राह्मण अप्रत्यक्षपणें आपल्या प्राणांचीच भिक्षा मागणार आहे म्हणून. परंतु कर्ण कर्णच होता ! औदार्य हा त्याचा स्वभाव होता. दान देणें हा त्याचा धर्म होता. मग तें प्राणाचें का दान असेना, तें द्यावयास तो कधींच मागें सरला नसता.

हा तेजस्वी श्रेष्ठ ब्राह्मण आपण होऊन आज आपल्या-पाशीं दान मागावयास आला यांतच कर्णाला धन्य धन्य वाटलें. आपण कृतार्थ झालों असें त्याला वाटूं लागलें. त्यानें त्याच्या पायावर मस्तक ठेवून त्याला नमस्कार केला आणि आदरानें हात जोडून तो त्या ब्राह्मणरूपी इंद्रासमोर उभा राहिला.

वास्तविक पद्धतीप्रमाणें इन्द्रानें त्याला ब्राह्मण या नात्यानें 'तुला पुष्कळ आयुष्य लाभो' असा आशीर्वाद लगेच द्यावयास पाहिजे होता. परंतु जो जगूं नये म्हणून कपटनाटक रचून इन्द्र तेथें आला होता त्याला 'पुष्कळ वर्षें जग' असा आशीर्वाद इन्द्र कसा देऊं शकणार? कारण दिलेल्या आशीर्वादाप्रमाणें घडून येणार हें स्पष्टच होतें. बरें, कांहींच आशीर्वाद न देतां स्वस्थ राहावें तर कर्ण त्या ब्राह्मणाची अक्कल ओळखून त्याला धुडकावून लावण्याची भीति होती. तेव्हां इन्द्रानें तिसराच एक मार्ग काढला. तो कर्णाला आशीर्वाद देत म्हणाला, "कर्णा! सूर्य, चंद्र, हिमालय व समुद्र यांच्याप्रमाणें तुझी कीर्ति चिरकाल राहो."

कर्णाला तो आशीर्वाद ऐकतांच एकदम चमत्कारिक

वाटलें. नेहमींच्या पद्धतीप्रमाणें 'दीर्घायु हो' असा आशीर्वाद या ब्राह्मणानें आपल्याला कां दिला नाहीं असा विचार त्याच्या मनांत आलाहि. पण त्यानें स्वतःच स्वतःचें समाधान लागलीच करून घेतलें. 'माणसानें प्रयत्नपूर्वक धर्मच साधावा. कारण राज्यवैभव हें सापाच्या जिभेइतकें चंचल असतें. तेव्हां राजांनीं प्रजेचें पालन प्रामाणिकपणानें करीत सद्धर्मानें वागावें हेंच इष्ट आहे. देह कितीहि दिवस टिकला तरी कधींना कधीं तो पडणारच. धर्मपालनाची, सद्गुणांची कीर्ति मात्र चिरकाल राहावयाची असते.' असें कर्णानें स्वतःचें समाधान करून 'आपली काय इच्छा मी पुरी करावी ?' असें त्या ब्राह्मणाला विचारलें.

तेव्हां इन्द्रानें पुन्हां म्हटलें कीं, 'माझी भिक्षा फार मोठी आहे.' इतकी मोठें मागणें पुरवणें तुला जमेल किंवा कसें तें पाहा असें तो कर्णाला सुचवीत होता. पण कर्ण जिथे कांहींहि द्यावयाला तयार होता तिथे प्रश्न कोठें होता ? त्यानें सांगितलें कीं 'तुझें मागणें केवढेंहि मोठें असलें तरी मी तें पुरवीन. माझें ऐश्वर्य अमाप आहे.' तथापि कर्णाला वाटलें कीं हा ब्राह्मण मागून मागून काय मागणार ? हजार गायी ! त्या देणें म्हणजे त्याला कांहींच नव्हतें.

" दुधाळ व गुणवान अशा हजार गाई मी तुला हव्या तर देतों. नुसत्या गाई नव्हें तर तरण्या, :आपापल्या वांसरांसहित आणि त्यांचीं शिगें सोन्यानें मढवून त्या मी देतों हव्या तर, " कर्णानें सांगितलें. परंतु हा ' ब्राह्मण ' त्यानें संतुष्ट होणारा नव्हता. तो म्हणाला, " हजार गाई घेऊन मी काय करणार! कांहीं थोडा काळ मी दूध पिऊं शकेन इतकेंच. नको बाबा कर्णा, मला तुझ्या गाई नकोत ! "

ब्राह्मणाला अशा हजार गाईहि नकोत हें पाहून कर्णाला मोठें आश्चर्य वाटलें. मग त्यानें कांबोज देशांतले उत्तमोत्तम असे हजारों घोडे त्या ब्राह्मणाला देऊं केलें. परंतु त्यानेंहि ब्राह्मणाची तृप्ति होईना. तेव्हां मग कर्णानें त्याला युद्धोपयोगी असा उत्तमोत्तम हत्तींचा हवा तेवढा तांडा देऊं केला. परंतु ब्राह्मण म्हणाला कीं, घोडे काय नि हत्ती काय, कांहीं दिवस त्यांच्यावर बसण्यापलीकडे त्यांचा आपल्याला काय उपयोग ! अर्थात त्यानें तेंहि दान स्वीकारण्याचें नाकारलें.

मग कर्णानें त्याला म्हटलें कीं, "अगणित सोनें मी तुला

देतों. हवें तर सगळ्या पृथ्वीचें राज्य जिंकून देतों. अग्निष्टोम यज्ञाचें फळ देतों." परंतु तो हटवादी ब्राह्मण त्यांपैकीं कशालाच कबूल होईना. शेवटीं कर्णानें निर्वाणीचें म्हणून विचारलें, "मग आपल्या चरणीं मी माझें शिर अर्पण करतों. त्यानें तरी आपण संतुष्ट व्हाल ?" तेव्हां तो ब्राह्मण 'शांतं पापं' 'शांतं पापं' म्हणून कानांत बोटें घालूं लागला.

तथापि कर्ण कांहीं एवढ्यानें हार जाणारा नव्हता. त्यानें पुन्हां त्या ब्राह्मणाला नम्रपणें म्हटलें, "भगवान, माझ्यापाशीं माझ्या अंगाला सहजच उत्पन्न झालेलीं हीं कवचकुंडलें आहेत. माझ्या देहाचें रक्षण करणारीं हीं कवचकुंडलें देवदानवांनाहि आपल्या अस्त्रांनीं फोडतां येण्यासारखीं नाहींत. अशीं हीं कवचकुंडलेंहि, जर आपली इच्छा असेल तर, मी आपल्याला आनंदानें द्यावयाला तयार आहें."

"हां हां तीं द्या," तो इन्द्ररूपी ब्राह्मण आतां चटकन म्हणाला.

कर्ण समजला कीं, याला खरोखरी हेंच आपल्यापासून हवें होतें. ' मोठी भिक्षा ' ' मोठी भिक्षा ' म्हणून तो जें म्हणत होता ती हीच.बहुधा अनेक कपटनाटकें रचणाऱ्या कृष्णाची तर ही क्लृप्ति नसावी ! असेंहि त्याच्या मनांत आलें. परंतु आतां मागाहून शोक करण्यांत कांहीं अर्थ नव्हता. हें सारें कृष्णाचेंच कपटकारस्थान असलें पाहिजे अशी त्याची खात्रीच होऊन चुकली होती. तरीपण तें कांहीं असलें तरी आतां मागें सरणें त्याला शक्य नव्हतें. म्हणून तो उघडपणें " हीं घ्या तर " असें म्हणून आपल्या अंगाचीं अभेद्य कवचकुंडलें काढून त्या ब्राह्मणाला देऊं लागला. शल्यानें त्याला तीं न देण्याबद्दल सूचना केली, नको नको म्हणून निवारण्याचा प्रयत्न केला. परंतु कर्ण उलट त्यालाच म्हणाला, " शल्यराज, आतां मला अडवूं नका. शिकलेली विद्या कालान्तरानें लोपते; जमिनींत कितीहि खोलवर पाळेंमुळें गेलेले वृक्षहि उन्मळून पडतात आणि जलाशयांतलें पाणी आटून केव्हांतरी ते कोरडे होतात. यज्ञांत केलेलें हवन आणि दिलेलें दान मात्र जसेंच्या तसेंच टिकून राहातें. आणि म्हणून हें दान मी करून टाकणेंच योग्य आहे. " असें बोलून कर्णानें आपल्या

अंगचीं कवचकुंडलें तोडून काढलीं आणि तीं दान म्हणून इन्द्राच्या हातावर ठेवलीं.

इन्द्राचें काम झालें. आपला पुत्र अर्जुन याला युद्धांत जय मिळावा म्हणून देवांच्या संमतीनें त्यानें हें नाटक अगोदरच रचलेलें होतें. तें काम पार पडल्याच्या समाधानांत तो तिथून निघून गेला.

पण शल्यानें ओळखलें कीं ही स्वारी इन्द्राची होती. अर्जुन हा इन्द्राच्या अंशामुळें झालेला असल्यानें त्याला स्वतः-चा मुलगा म्हणून मानून इन्द्र त्याच्या हितासाठीं झटत असतो हें इतरांप्रमाणें शल्यालाहि माहीत होतें. त्यामुळें त्याच्या या कपटाचा अर्थ त्याच्या लक्षांत यावयास उशीर लागला नाहीं. अभेद्य कवचकुंडलांमुळें कर्ण अर्जुनाच्या हातून मरणें शक्य नव्हतें व उलट अर्जुनालाच त्याच्यापासून भीति होती. हें ओळखूनच इन्द्रानें कर्णाचीं कवचकुंडलें कपटानें ऐनवेळीं पळविलीं होतीं.

त्यामुळें शल्याला वाईट वाटलें. तो म्हणाला, " अंगराज, तुम्हांला फसविलें."

कर्णानें विचारलें " कोणी ? "

शल्य म्हणाला, " इन्द्रानें."

तेव्हां मात्र कर्णानें सांगितलें कीं, " नाहीं, इन्द्रानें मला फसविलें नसून, तोच माझ्या हातून फसला आहे. अनेक यज्ञांतून आहुत्या देऊन ब्राह्मण त्याला संतुष्ट करीत असतात, तरी त्याचें समाधान अद्यापि झालेलें आहे असें म्हणतां येणार नाहीं. आणि वास्तविक त्याची योग्यता तरी केवढी मोठी ! राक्षसांचा संहारक म्हणून त्याच्या पराक्रमाची प्रसिद्धी. तो माझ्यापाशीं याचक म्हणून आला. मीच एक असा आहें कीं ज्यानें त्याला हवें तें दान देऊन त्याची इच्छा तृप्त केली आहे. तेव्हां इन्द्रच माझ्या हातून फसला हेंच मला बरोबर वाटतें."

कर्ण-शल्यांचें हें बोलणें चाललें आहे तोंच इन्द्राकडून एक दूत घाईघाईनें तेथें आला. कर्णापासून कपटानें कवच-कुंडलांचें दान घेतल्यामुळें आपणच एक प्रकारें फसलों,त्या-मुळें आपलीच अपकीर्ति होईल अशी, हें दान घेऊन गेल्या-नंतर इन्द्राला स्वतःचीच लाज वाटूं लागली. आपली फसगत झाली कीं काय असें वाटून त्याला पश्चात्तापहि झाला. म्हणून त्यानें त्या दानाची परतफेड करण्यासाठीं

आपला एक दूत कर्णाकडे पाठविला होता. त्याच्याबरोबर त्यानें एक प्रभावी शक्ति पाठविली होती. ती विमला नांवाची शक्ति अगदीं रामबाणासारखी अचूक उपयोगी पडणारी होती. पांच पांडवांपैकीं कोणाहि एकाचा वध करण्याचें सामर्थ्य त्या शक्तींत होतें. केव्हांहि आठवण करतांच ती कर्णापाशीं येऊन राहाणार होती. ही सगळी हकीकत सांगून इन्द्राचा दूत ती शक्ति कर्णाला देऊं लागला.

परंतु कर्ण खरा दाता होता. त्यानें सांगितलें कीं, " मी दान दिलेल्यापासून कांहीं परत घेत नसतों. " तेव्हां देव-दूतानें आग्रह केला कीं, " निदान ब्राह्मणाचें सांगणें आहे म्हणून तरी याचा स्वीकार कर. " तेव्हां मात्र ब्राह्मण-वचन मोडल्याचें पाप लागूं नये म्हणून कर्णानें ती शक्ति त्याच्याजवळून घेतली.

प्रलयकाळीं गर्जणाऱ्या समुद्राच्या गर्जनेप्रमाणें शंखध्वनी ऐकूं आला. हा भयंकर शंखध्वनी एक तर श्रीकृष्णाचा किंवा स्वतः अर्जुनाचा असला पाहिजे हें कर्णानें ताडलें. युधिष्ठिराचा पराभव झाला असला तर तें समजल्या-

नंतर अर्जुन आपलें सर्व शौर्य पणाला लावून युद्ध करील ही कर्णाची खात्री होती. त्यामुळें अर्जुनाशीं गांठ घालण्या-करितां म्हणून तांतडीनें तो आपल्या रथांतून तिकडे निघाला.

संस्कृत साहित्य सरितेचीं पुस्तकें

२६

१. रघुवंश
२. शाकुन्तल
३. विक्रमोर्वशीय
४. मृच्छकटिक
५. प्रतिमा
६. महावीरचरित
७. उत्तररामचरित
८. मालतीमाधव
९. स्वप्नवासवदत्ता
१०. दशकुमारचरित : भाग १
११. दशकुमारचरित : भाग २
१२. वेणीसंहार
१३. कुमारसम्भव
१४. मालविकाग्निमित्र
१५. हर्षचरित
१६. नागानंद
१७. पंचरात्र
१८. रत्नावली
१९. कादम्बरी
२०. मेघदूत
२१. शिशुपालवध
२२. किरातार्जुनीय
२३. बुद्धचरित
२४. मुद्राराक्षस
२५. प्रतिज्ञायौगंधरायण
२६. अविमारक
२७. अभिषेक
२८. मध्यमव्यायोग
२९. कर्णभार
३०. उरुभङ्ग
३१. पार्वतीपरिणय
३२. नलोदय

प्रत्येकीं किंमत ६ आणे

६ आणे

व्होरा ॲन्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लि०

